**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाचा दुसरा हप्ता वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.१३७/नवि-३४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २४ डिसेंबर, २०२०

**वाचा:**

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वभाअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४,दि. १५.०५.२०१५.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक:स्वमअ-२०१६/प्र.क्र.१७३/नवि-३४ दि. ३.११.२०१७.
३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.१३७/नवि-३४,दि. १०.११.२०१७.
४) शासन शुध्दिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.१३७/नवि-३४,दि. ७.१२.२०१७.
५) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक. धोरण-२०१७/ प्र.क्र.९६/ नवि-१६, दि. १२.१२.२०१७.
६) वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/अर्थ-३, दिनाक १६.४.२०२०.
७) वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनाक ४.५.२०२०.
८) केंद्र शासनासचे पत्र क्र. F. No. १/७/२०१५-SBM-I (Computer No. ३१०४७०६), दि १७/१२/२०२०.

**शासन निर्णय:**

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे आणि सर्व नागरिकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची आणि या शहरामधील नागरीकांना घरगुती शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने केंद्र शासनाने "स्वच्छ भारत अभियान (नागरी)" ची अंमलबजावणी सुरु केली आहे. या अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदर योजने अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रकल्पास संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. स्वच्छ भारत अभियानांतर्गत बृहन्मुंबई शहराच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या मंजूर करण्यात आलेल्या रूपये ८७७.७६०० कोटी किंमतीच्या सविस्त प्रकल्प अहवालाकरीता केद्र शासनाच्या हिश्याचा दुसरा हप्ता रूपये ७६,८०,४०,०००/- (रूपये श्याहत्तर कोटी ऐंशी लक्ष चाळीस हजार फक्त) इतका निधी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ८ येथील पत्रान्वये राज्यास प्राप्त झाला असून सदर निधी बृहन्मुंबई शहराच्या मंजूर घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रकल्पाकरीता सन २०२०-२१ साठी (२२१७ ९७५२) या लेखाशिर्ष अंतर्गत वितरीत करण्यात येत आहे.

३. सदर निधी आहरित करण्यासाठी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर रकमेचे देयक तयार करून ते अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडे तात्काळ सादर करून सदर निधी आहरित करून धनादेश प्राप्त करून घेण्यात यावा. बृहन्मुंबई महानगरपालिकेस वितरीत करण्याबाबतची कार्यवाही राज्य अभियान संचालक यांनी करावी.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक: अनौ-२७७/अर्थोपाय, दिनांक २४.१२.२०२० अन्वये करण्यात आली आहे. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० मधील लागू असलेल्या उर्वरित सर्व अटींची पूर्तता होत आहे.

५. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० मधील ६ अन्वये ३१ वेतनेत्तर सहायक अनुदाने या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर शासन निर्णयान्वये एकूण रूपये रूपये ७६,८०,४०,०००/- (रूपये श्याहत्तर कोटी ऐंशी लक्ष चाळीस हजार फक्त) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे.

६. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: अनौ-२७७/अर्थोपाय, दिनांक २४.१२.२०२० अन्वये अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२०१२२४१६४३५३०७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajit Sahebrao Palwe

Digitally signed by Ajit Sahebrao Palwe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bcc5dbdaa52955626b8257f1105a8a62ddbd1337948a428b4e4c992e5d3bf423, serialNumber=eeec7a4defed4a9827acaa40b255e88289e62111c82bcdb7dd2fe58860768930, cn=Ajit Sahebrao Palwe
Date: 2020.12.24 16:49:12 +05'30'

**(अजित पालवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
६) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
८) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
९) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११) अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई.

१२) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई.
१३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१४) मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१६) कक्ष अधिकारी (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवडनस्ती, नवि-३४